बाल संगोपन योजनेसाठीच्या चालू आर्थिक वर्षातील उपलब्ध अनुदानातून योजनेचे प्रलंबित असलेले अनुदान अदा करणेबाबत.

महाराष्ट्र शासन
महिला व बाल विकास विभाग
शासन निर्णय क्र.बीजीटी-२०१८/प्र.क्र. ९८ /का ८
नवीन प्रशासन भवन, ३ रा मजला,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक : २७ मार्च, २०१९.

वाचा:-

१) शासन निर्णय , महिला व बाल विकास विभाग क्र. बालसं-२०११/प्र.क्र.३१३/का-०८, दि. ९.१०.२०१३

२) शासन निर्णय समक्रमांक दि. १९जून,२०१८, दि. ८.२.२०१९

३) आयुक्तालयाचे पत्र क्र.मबाविआपु/बावि/बालसं/२०१८-१९/का-५/१६१२ , दि. २२.३.२०१९.

शासन निर्णय :-

१. बाल संगोपन योजनेअंतर्गत चालू आर्थिक वर्षात मागणी क्र. एक्स-०१, २२३५, सामाजिक सुरक्षा व कल्याण, ०२, समाजकल्याण, १०२, बाल कल्याण, (१५) (०१) बाल संगोपन योजनेसाठी स्वयंसेवी संस्थांना सहायक अनुदान (कार्यक्रम) (२२३५ B९०६), ३१, सहायक अनुदान (वेतनेत्तर) अंतर्गत रू. १५.०० कोटी इतका निधी अर्थसंकल्पित करण्यात आला असून त्यापैकी रू. १२.०० कोटी इतका निधी क्षेत्रीय स्तरावर खर्चासाठी उपलब्ध करण्यात आला आहे. बाल संगोपन योजनेसाठी चालू आर्थिक वर्षात उपलब्ध अनुदानातून चालू आर्थिक वर्षाची मागणी लक्षात घेता, शिल्लक राहणा-या निधीतून योजनचे प्रलंबित असलेले अनुदान अदा करण्यास मंजूरी देण्याची विनंती संदर्भ क्र. ३ च्या पत्रान्वये करण्यात आली आहे. सदरची विनंती लक्षात घेता, सदर योजनेचे मार्च, २०१८ पूर्वीचे प्रलंबित अनुदान चालू आर्थिक वर्षाच्या शिल्लक राहणा-या अनुदानातून खर्च करण्यास खालील अटीच्या अधीन मंजूरी देण्यात येत आहे:-

बाल संगोपन योजनेचे अनुदान हे ३१, सहायक अनुदानांतर्गत वितरित करण्यात येणार असल्याने योजनेच्या खर्चाचे उपयोगिता प्रमाणपत्र शासनास सादर करणे आवश्यक आहे. सदर उपयोगिता प्रमाणपत्रामध्ये संबंधित आहरण व संवितरण अधिकारी यांनी योजनेचे चालू आर्थिक वर्षातील लाभार्थी संख्या (संस्थास्तर व जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी स्तर) व त्यानुसार खर्च करण्यात आलेला निधी आणि प्रलंबित असलेल्या अनुदानाच्या अनुषंगाने संबंधित आर्थिक वर्ष, लाभार्थी संख्या (संस्थास्तर व जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी स्तर) व त्यानुसार खर्च केलेला निधी यांच्या स्वयंस्पष्ट माहिती सादर करणे आवश्यक राहील. त्याप्रमाणे उपयोगिता प्रमाणपत्र प्राप्त करण्याची जबाबदारी -नियंत्रक अधिकारी◦ म्हणून आयुक्त, महिला व बाल विकास यांची राहील. उपयोगिता प्रमाणपत्रामध्ये वरीलप्रमाणे माहिती नमुद नसल्यास उपयोगिता प्रमाणपत्र स्वीकारले जाणार नाही व त्याबाबत संबंधित आहरण व संवितरण अधिकारी यांचेवर जबाबदारी निश्चित केली जाईल.

२. सदर शासन निर्णय शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असून त्याचा संकेतांक २०१९०३२७१७३८५१९५३० असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Smita Dattatray Nivatkar

Digitally signed by Smita Dattatray Nivatkar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Women and Child Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=3fa46cf1e928518ffc98619187a1ef6de2dd57c16934e9cb6672cc02aa258b08, serialNumber=f9bd2a7c214922f8f4939e80711ece461c9dfd9c679b28f98e79475c5ea90e21, cn=Smita Dattatray Nivatkar
Date: 2019.03.27 17:42:31 +05'30'

(स्मिता निवतकर)
उप सचिव,महाराष्ट्र शासन.

प्रत -

१) मा.राज्यपाल, यांचे सचिव,राजभवन,मुंबई
२) मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय,मुंबई .
३) मा.अध्यक्ष/उपाध्यक्ष विधानसभा ,महाराष्ट्र विधानमंडळ. मुंबई .
४) मा.सभापती/उपसभापती विधानपरिषद ,महाराष्ट्र विधानमंडळ. मुंबई .
५) मा.विरोधी पक्ष नेता, विधानसभा /विधानपरिषद,महाराष्ट्र विधीमंडळ.
६) मा.मंत्री (म व बा वि)/ राज्यमंत्री(म व बा वि),यांचे खाजगी सचिव ,मंत्रालय ,मुंबई .
७) मा.मुख्य सचिव,महाराष्ट्र राज्य यांचे उपसचिव,मंत्रालय,मुंबई
८) अपर मुख्य सचिव, नियोजन विभाग, यांचे वरिष्ठ स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई
९) सचिव, महिला व बाल विकास विभाग, नवीन प्रशासकीय भवन, मुंबई.
११) प्रधान सचिव (व्यय),वित्त विभाग,मंत्रालय,मुंबई
१२) प्रधान सचिव (ले व को),वित्त विभाग,मंत्रालय,मुंबई
१३)आयुक्त , महिला व बाल विकास आयुक्तालय,म.रा. पुणे.
१४)संचालक,स्थानिक निधी लेखा परीक्षा,कोकण भवन,नवी मुंबई
१५)महालेखापाल १, महाराष्ट्र राज्य (लेखापरीक्षा / लेखा व अनुज्ञेयता),मुंबई
१६)महालेखापाल २, महाराष्ट्र राज्य (लेखापरीक्षा / लेखा व अनुज्ञेयता),नागपूर
१७) सर्व उपसचिव ,सर्व अवर सचिव, महिला व बाल विकास. नवीन प्रशासकीय भवन , मुंबई
२०)उपायुक्त (बालविकास) महिला व बाल विकास आयुक्तालय, म.रा.पुणे.
२१) कार्यक्रम व्यवस्थापक, महाराष्ट्र राज्य बाल संरक्षण सोसायटी, पुणे.
२१)वित्त विभाग (व्यय-६/अर्थसंकल्प-७/कोषा-प्रशा-२), नियोजन विभाग (का-१४७२) मंत्रालय,मुंबई -३२,
२२) सर्व जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी.
२३) सर्व कार्यासने, महिला व बाल विकास विभाग, नवीन प्रशासकीय भवन , मुंबई
२५) निवड नस्ती का-८